डॉ. ऋग्वेद कहारे 2019-20

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १० वे अंक ३ रा
ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०१९



Principal
Chetna Shikshan Prasarak Mandal Vaijapur
KALA VARIShtA MAHAVIDYALAYA
Sawangi, By Pss Road, Aurangabad-431008

39




ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal
साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

**वर्ष** : दहावे, **अंक** : तिसरा
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

संपादक :
**डॉ. शिवाजी भिकाजी हुसे**
**अतिथी संपादक :**
**डॉ. सुखदेव इघारे**

संपादक मंडळ :
डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रकाश खेत्री,
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. कैलास दौंड,
प्रा. संजय भालेराव, प्रा. आर. व्ही. वाघमारे
डॉ. तुषार चांदवडकर, डॉ. राजेंद्र चौधरी,
डॉ. रामनाथ वाढे, शफी बोल्डेकर

**मुखपृष्ठ** : अक्षदा ॲडस्
**मुद्रक** : रुद्रायणी, औरंगाबाद
**मुद्रितशोधन** : तत्सत
**मुखपृष्ठ छायाचित्र** : सोशल मिडियावरून साभार

**अक्षर जुळणी, मांडणी व सजावट :**
नीट एन्टरप्रायजेस, औरंगाबाद.
फोन : ८७८८४७५२०८

*** वर्गणी ***
वार्षिक : २००, पंचवार्षिक : १०००
वर्गणी अशीही भरता येईल –
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.सी. कोड क्र. MAHB0000259

**स्वागत मूल्य** : ५० रु.

संपादन : अवैतनिक

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ता:**
संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड – ४३१ १०३
ता. कन्नड, जि. औरंगाबाद.
मो. : ९४०४०००३९८
E-mail - huseshivaji@yahoo.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# अनुक्रम


* संपादकीय ........................ ३
* राजकीय पटलावर शेतकरी ........................ ५
  – डॉ. गणेश मोहिते
* साक्षेपी समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे ........................ ११
  – डॉ. महेश खरात
* गुलामगिरीतील संस्कृती संघर्षाचा अन्वयार्थ ........................ २०
  – केदार काळवणे
* बँडमास्तर ते शाळामास्तर ते साहित्यिक ........................ २७
  – अय्यूब पठाण लोहगावकर
* मैत्र जिवांचे ........................ ३१
  – प्रा. मीनल येवले
* संमेलनाध्यक्षांचे मनोगत ........................ ३५
  – सुनील गायकवाड
* मराठी साहित्यातील स्त्रियांच्या आत्मकथनाचे स्वरूप आणि वेगळेपण ........................ ३८
  – प्रा. मीनाक्षी पाटील
* वहिणाबाई शिऊरकर यांच्या लेखनातून येणारे संत तुकारामांविषयीचे संदर्भ ........................ ४४
  – प्रा. बालासाहेब कटारे
* महानुभाव, संत व पंत वाङ्मयातील विनोद ........................ ५०
  – डॉ. सुखदेव इघारे
* वारकरी संप्रदायातील संतांची काव्यपरंपरा ........................ ५९
  – डॉ. सुषमा प्रधान घेवंदे
* मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी कविता : 'तू जाऊन तीन तप झालीत' ........................ ६५
  – डॉ. आप्पा दत्तू माने
* धनगरी लोकजीवनाचा सांस्कृतिक दस्तऐवज : 'का धरिला परदेस' ........................ ७२
  – डॉ. फुला बागूल
* कविता ........................ ७९–८०
  – डॉ. शांतीलाल चव्हाण, प्रा.डॉ. कृष्णा कदम, मेघराज मेश्राम

# महानुभाव, संत व पंत वाङ्मयातील विनोद

- डॉ. सुखदेव ढ्घारे

प्रास्ताविक :

अगदी आदिमानवस्थेपासून माणसाला विनोद आवडतो, नव्हे विनोद मानवी जीवनाचा एक अविभाज्य भागच असतो. मानवी जीवनातून विनोद वजा केल्यास जीवन नीरस आणि बेचव होईल यात कसली शंका नाही. विनोदाचा मानवी जीवनाशी इतका घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळेच माणसाला हसरा प्राणी म्हटले जाते. विनोदामुळे माणूस केवळ हसतो किंवा विनोद केल्यामुळे अथवा ऐकल्यामुळे माणसाची प्रगती खुंटते असे कदापीही म्हणता येणार नाही. विनोदाचे स्वरूप आणि त्याचा अतिरेक यावरही बऱ्याच काही गोष्टी अवलंबून असतात. विनोदामुळे माणूस व समाजातील दोष नाहीसे करता येतात. माणसामध्ये दैवी आणि पाशवी अशा ज्या दुहेरी आहेत. त्या दोहोंचाही विनोदाशी संबंध असतो. त्यामुळेच तो माणसाचे जागेपणा सतत तेवत ठेवण्याचे कार्य करतो. सर्वसामान्य माणसाकडे बोट दाखवून त्याला अंतर्मुख करतो आणि विशुद्ध विनोदाच्या रूपाने निर्माण होणारे हास्य त्याला दिव्यत्वाच्या सीमारेषेवर नेऊन त्याचे भावविश्व उजाळून टाकते.

विनोद जर माणसाला दिव्यत्वाच्या सीमेवर घेऊन जाणारा असेल तर मग असा विनोद कोणाला भुरळ घालणार नाही? विनोदाची भुरळ सृजनक्षम कलावंतांनाही पडलेली आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या लोकसाहित्यात तो जागोजागी आलेलाच आहेच; परंतु समाजाचे उद्बोधन आणि प्रबोधन करणाऱ्या मध्ययुगीन कालखंडातील महानुभाव, संत आणि पंडित कवींच्या काव्यातही आलेला दिसतो. या कालखंडात विनोदाला प्रतिष्ठा नव्हती आणि संत किंवा पंडित कवींनी विनोद निर्मिती करण्यासाठी सात्यिनिर्मिती केलेली नाही हे खरे असले तरी संस्कृतमधील तत्तवज्ञान सामांन्यजनांना चटकन समजावे. भक्तीरसाची गोडी समान्यजनांना चाखता यावी, तत्त्वज्ञानात कुठेही किचकटता, जटीलता, बोजडपणा येऊ नये म्हणून संत कवींच्या काव्यात नकळतपणे समसजसुधारणेचे काम करणारा उपहासात्मक विनोद कळतनकळतपणे आलेला आहे.



Principal
Chetna Shikshan Prasarak Mandal Vaijapur
KALA VARISHTA MAHAVIDYALAYA
Sawangi, By Pss Road, Aurangabad-431008

तर पंडित कवींनी आपले अख्यानकाव्य मनोरंक आणि मोहक व्हावे म्हणून कुठे अतिशयोक्तीतून तर कुठे प्रसन्न विनोदची निर्मिती केलेली दिसते.

**महानुभाव, संत व पंत वाङ्मयातील विनोद :**

आद्यकवी मुकुंदराजाने संस्कृतमधील तत्त्वज्ञान सर्वसामान्य माणसाला समजावे म्हणून शके १९१० म्हणजे इ.स. ११७८ रोजी 'विवेकासिंधू' या ग्रंथाची निर्मिती केली. हा ग्रंथ तत्त्वज्ञान सांगणारा असला तरी तत्त्वज्ञान सामान्यांच्या गळी उतरावे म्हणून अधुनमधून विनोदाचाही वापर झालेला दिसतो. सुरुवातीलाच ते आपल्या ग्रंथाविषयी श्रोत्यांना सांगतात की, 'गुरुशिष्याचेनि संवादे। जे बोलिजेल विनोदे। ते आईक तू आनंदे। महानुभावे।। इथे गुरू शिष्याने जो काही थोड्या फार विनोदी पद्धतीने संवाद साधला आहे तो श्रोत्यांना ब्रह्मरसाची गोडी चाखता यावी म्हणूनच. शिवाय 'पाचही दरूषने जंबुके। वेदांत सिंहाचे ये हाके। आईकोनि म्हणती राख राखे। भजलो मी तूज।।' इथे पाच दर्शनाला जी काही जंबुकाची उपमा दिली आहे यातून आणि इतरही ठिकाणी अधूनमधून ज्याकाही उपमा प्रतिमांचे आयोजन केले आहे त्यातून उपहास आलेला आहे. मुकुंदराजाचा 'परामामृत' हा ग्रंथही तत्त्वज्ञानपरच आहे. परंतु यातील तत्त्वज्ञान सांगतानाही ते नम्रविनोदशैलीचा वापर करताना दिसतात. त्याचे एक उदाहरण म्हणजे त्यांनी ब्रम्हनंदस्थितीविषयी सांगताना 'आनंद आनंदास घोटी। बोलता परेसी पडे मिठी। मुक्याने सुखाच्या गोठी केवि किजे।।' असा जो सुदर दृष्टांत दिला आहे त्यातून मिस्किल हास्य निर्माण झाल्या शिवाय रहात नाही. परंतु विनोद निर्मिती करणे किंवा त्याचा आधार घेणे हा काही मुकुंदराजाचा ग्रंथनिर्मितीमागील हेतू नाही. तो कळत नकळतपणे इथे आलेला आहे. एवढेच सांगावयाचे आहे.

पुढे महानुभवापंथीय साहित्यातही बऱ्याच ठिकाणी विनोदस्थळे सापडतात. मग ते म्हाईंभटाचे लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र असो किंवा महदंबेचे धवळे असोत अथवा महानुभवापंथीयांची इतर अख्यानकाव्य असोत या सर्वातून विनोदाचे दर्शन घडतेच. महदंबेच्या धवळ्यातील श्रीकृष्णा रुक्मिणी स्वयंवर प्रसंगात, श्रीकृष्णाला बघण्यासाठी रुक्मिणीची झालेली अवस्था, कृष्णाच्या रूपाचे वर्णन करताना आपल्या मनातील अभिलाषेचा रुक्मिणीस संशय येऊ नये म्हणून तिच्या सख्यांनी कृष्ण आम्हास पित्यासमान असल्याचे सांगणे, यातून जशी विनोदनिर्मिती झालेली आहे तशीच उत्तरार्धातील श्रीकृष्ण आणि रुक्मी यांच्यातील केलेली फजिती व शेवटी मेहुणा या नात्याने रुक्मीची थट्टा केल्याचे कृष्णाने सांगणे हा सर्व प्रसंगनिष्ठ आणि प्रसन्न विनोद आहे.

वारकरी संप्रदायाचा पाया रचनारे थोर संत ज्ञानेश्वर यांनी भगवतीतेसारख्या संस्कृत

ग्रंथात बंदिस्त झालेले जीवनतत्त्वज्ञान मराठीजनांना समजावे म्हणून मराठी प्राकृतात ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ रचण्याचा घाट घालतात. तत्त्वज्ञान अभिव्यक्त करण्यासाठी नऊ रसांचा कल्लोळ घडवून आणला. यात हास्यरसाचाही समावेस असल्याचे बघावयास मिळते. याची काही उदाहरणे पहावयाची झाल्यास धृतराष्ट्राचे स्वभाव ज्ञानेश्वरीत अधुनमधून पाहावयास मिळतात. तत्त्वज्ञान पटवून देण्यासाठी हास्यनिर्मिती झाल्याशिवाय रहात नाही. 'चंदणाची चोळी माझे अंग अंग जाळी', 'जागृती पुसे साजणी। कवण बोलिले आंगणी' यासारख्या त्यांच्या विराण्या तत्त्वज्ञानाने ओतप्रोत भरलेल्या असल्या तरी वरवरच्या अर्थाकडे पाहिल्यास स्मितहास्याची निर्मिती होतेच.

वारकरी संप्रदायातील संतशिरोमणी संत नामदेव यांच्याही अभंगातून काही ठिकाणी हास्यविनोदाच्या लकेरी झळकताना दिसतात. 'माझा नाम मज देई। जीव देईन तुझे पायी।।' असे विठ्ठलाला भांडणारी गोणाई किंवा' लावोनि लंगोटी जालेती गोसावी।' असे म्हणणारी राजाई यांचे चित्र संत नामदेव आपल्या अभंगातून उभे करतात तेव्हा हास्यनिर्मिती होते. भक्ती भावनेने देवत्वात समर्पित व्हावे असे नामदेवाला वाटते पण ओढाळ मन सतत वासना आणि संसार यांच्याकडेच धाव घेते तेव्हा ' अरे मना मर्कटा । पापिया चंडाळा लंपटा।' असा उपहागर्भ शब्दात नामदेव मनाचा समाचार घेतात. नामदेवांनी आपल्या बाळक्रीडेच्या अभंगात श्रीकृष्णाच्या बालपणापासून ते यौवनावस्थेपर्यंत नाट्ययपूर्ण व अद्भूतरम्य असे अनेक प्रसंग उभे केले आहेत. त्यांच्या महाबळभट्ट, दाढीवेणीबंधनकथा, राधाविलासवर्णन आदी प्रसंगात अद्भूतरम्यतेबरोबर प्रसन्न अशी विनोद निर्मिती झालेली आहे.

नाथपूर्वकालीन बहिरा जातवेद यांच्या 'भेरवी टीके' त जसवंती गोपी कृष्णाने माझ्या मुलाला फितवून माझ्या घरात दुधाची चोरी केल्याची तक्रार यशोदेकडे करते. हा प्रसंग त्यांनी अगदी रंगवून सांगितला आहे. तो पाहा- 'जव म्या वाट रुंधिली। कृष्णे दुधा गुळणी धरिली। माझे डोळा टाकिली। पळतले दोघे।। मी वो डोळे चोळित। आपण पळाले हासत।।' या तिच्या तक्रारीतून श्रीकृष्णाचा राग येण्याऐवजी खळखळून हसायला येते.

वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वर नामदेवानंतरचे महत्त्वाचे संत एकनाथ यांच्या साहित्यात तर जागोजागी विनोद आलेला आहे. त्यांच्या 'रुक्मिणीस्वयंवरात' रुक्मिणीहरणानंतर आलेल्या, कृष्ण रुक्मी युद्ध, रुक्मीची झालेली फजिती, कृष्ण-रुक्मिणी विवाह आदी प्रसंगात खळखहून हसायला येईल असा प्रसन्न विनोद येतो. त्यांच्या भावार्थ रामायणातही विनोदची स्थळे आढळतात. नाथाच्या कळानकाबद्दल बोलताना ल.रा. नसिराबादकर

म्हणतात की, ''ज्ञानी लोकांना परमार्थबोध निवविती, पंडितांना पदबंध सुखवितात पण सामान्यजनांना मात्र कथाविनोद आवडतो. नाथांनी या सामान्यांच्या भाषेत आपले निवेदन रसाळपणे केलेले असल्यामुळे ते अधिक परिणामकारक झाले आहे.'' इथे आपण सामन्यजनांची भाषा म्हणजेच हास्यविनोदाने युक्त असलेली भाषा असा अर्थ घेतला तरी वावगे ठरणार नाही.

संत एकनाथांच्या गौळणी, भारुडे आदी स्फुट रचनेतून तर अप्रतिम असा विनोद येतो.अज्ञजनांना समजेल, रूचेल अशा भाषेत भक्तीरस ओतून अध्यात्माची उकल नाथ करतात. कुठलीही जटीलता येऊन ते कंटाळवाणे होऊ नये म्हणून एकनाथ आपल्या स्फुट रचनेत चपखलपणे विनोदाची योजना करतात. 'ऐक ऐक सखेबाई । नवल मी सांगू काई। त्रैलोक्याचा धनी तो हा। यशोदेशी म्हणतो आई।।' अशी देव आणि मानव यांच्यातील विसंगती दाखवून त्यातून प्रसन्न विनोद साधतात. तर 'वारियाने कुंडल हाले । डोळे मोडित राधा चाले। राधा पाहुनि भुलले हरी । बैल दुभे नंदाघरी ।' या गौळणीत आलेल्या शुगारचित्रणातून हास्यनिर्मिती होते. याशिवाय 'मोडकेसे घर तुटकेसे छप्पर । देवाला देवघर नाही । मला दादला नको गं बाई ।' या भारूडातील सासरा म्हणजे अहंकार सासून म्हणजे कल्पना हे दोघेही अध्यात्मात कसे आडवे येतात. हे सांगण्यासाठी केलेली शब्दयोजना विनोदाची धमाल उडवून देते. 'विंचू' या भारूडातही कामक्रोधरूपी विंचू चावल्यामुळे होणाऱ्या वेदनांचे विनोदी अंगाने वर्णन आलेले आहे. शिवाय 'मनुष्य इंगळी अती दारूण' असा अध्यात्मापासून दूर पळणाऱ्या माणसाला उपहासात्मक फटकारा मारण्यासही ते विसरत नाहीत. म्हणूनच त्यांच्या भारूडाविषयी ''नाथांची भारूड रचना अशी बहुविध रूपांची आहे. त्यातून लोकांच्या भाषेत, लोकजीवनातील उदाहरणे देऊन नाथांनी अध्यात्म शिकविले आहे. मनोरंजनातून परमार्थाची भाषा शिकविली आहे.'' असे ल.रा. नसिराबादकरांनी जे मत व्यक्त केले आहे ते त्यांच्या भारूडातील विनोदाचे महत्त्व पटवून देणारेच आहे असे म्हणावे लागेल.

वारकरी संप्रदायाचा काळस होण्याचा मान प्राप्त झालेले आणि जनमनात घर करून बसलेले थोर संत तुकारामांच्या अभंगात मात्र इतर संतांच्या अभंगातील विनोदापेक्षा अधिकचा विनोद आलेला आहे. हे कोणालाही नाकारता येणार नाही. संत तुकाराम प्रसन्न विनोदाबरोबरच व्यक्ती स्वभावातील व समाजातील व्यंगाव घणाघात करतात तेव्हा त्यांच्या अभंगात उपहासात्मक विनोद येतो. जे घातक आहे. जे औचित्याला धरून नाही त्यावर सडकून टिका करणे हा संत तुकारामांचा मूळ स्वभावच आहे. त्यांच्या उत्कट अभिव्यक्तीतील प्रखडपणामुळे व्यक्तीतील आणि समाजातील उणिवा,

तृटी श्रोत्यांच्या चटकन डोळ्यात भरल्या शिवाय रहात नाहीत. तुकाराम महाराजांचे अभंग पाहिले म्हणजे याचा प्रत्यय येतो. ते पाहा- ''ऐसा हा लौकिक कदा राखवेना। पतित पावन देवराया ।। संसार करिता म्हणती हा दोषी । टाकिता आळशी पोटपोसा ।। आचार करिता म्हणती हा पसारा । न करिता नरा निंदाताती ।। सतसंग करिता म्हणती हा उपदेशी । येरा अभाग्यासी ज्ञान नाही ।।'' तुकाराम महाराज या अभंगातून सामाजिक व्यंगावर बोट ठेवून अशा लोकांना उपहासाचे फटकारे मारतात. ढोंगी संन्यास्यांचा ते 'दावूनि वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।।' असा उपहास करून चांगलाच समाचार घेतात. सालोमालोंसारख्या भुरट्या कवींनी तुकाराम महाराजांचे काव्य चोरून स्वतःच्या नावे खपविले तेव्हा तर 'उष्ट्याा पत्रावळी करूनिया गोळा । दावितसे कळा विद्वत्वाची ।' त्यांनाही असे उपरोधिक टोमणे मारून वास्तव जगासमोर आणले आहे. पायाला नारू झाल्यावर तिथे कापूर बांधण्याची गरज असते असे सांगतात. 'भले तरी देऊ कासेची लंगोटी । नाठाळाच्या पाठी हानू काठी।', 'मोले घातीले रडाया । नाही असू नाही माया ।', 'कोडियाचे गोरेपण । तसे अहंकारी मन ।', ' गाढव शृंगारिले कोडे । काही केल्या नव्हे घेडे ।' यासारख्या अभंगातून उपहास आणि विनोद असे विनोदाची दोनी प्रकार आलेले बघावयास मिळतात. मूर्ख माणसाचाा मूर्खपणा तुकाराम महाराज आपल्या खास अशा शैलीत उघड करतात तेव्हा वाचकाला खळखळून हसायला येते. त्याचा एक नमूना पाहा- 'ढाल तलवारे गुंतले हे कर। म्हणे मी झुंजार कैसे झुंजो।। पेटी पडदळे सिरे टोप ओझे । हे तो जाले दुजे मरणमूळ ।। बैसविले मला येणे अश्वावरी । धावू पळू तरी कैसा आता ।। असोनि उपाय म्हणे हा उपाय । म्हणे हाय हाय हाय करू ।। या अभंगात सर्वकाही जवळ असूनही त्यालाच अपाय म्हणाऱ्या मूर्ख माणच्या बोद्धिक व्यंगदर्शनातून मजेशीर विनोद साधला आहे. तसेच 'हीनवर बीजवर दोघी त्या गडणी । अखंड कहाणी संसाराची ।। माझा पती बहु लहाणची आहे । खेळावया जाय पोरांसवे ।। माझे दुःख जरी ऐकशील सई । म्हतारा तो बाई खोकतसे ।। खेळे सांजवरी बाहेर तो राहे । वाट मी हो पाहे सेजेवरी ।। पूर्व पुण्य माझे नाही बाई नीट । बहु होती कष्ट सांगो काई ।। जवळी मी जाते अंग अंग लावू । नेदी जवळ येऊ कंटाळतो ।। पूर्वसुकृताचा हाचि बाई ठेवा । तुका म्हणे देवा काय बोल ।' किंवा 'वाघे उपदेशिला कोल्हा । सुखे खाऊ द्यावे मला ।। अंति मरसी ते न चुके ।' आदी अंभगात तर अप्रतिम विनोद निर्मिती झालेली आहे. संत तुकारामांनी तत्कालीन अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांवर सातत्याने कोरडे ओढून त्यानुसार वागणाऱ्या व्यक्तींचा उपहासच केलेला आहे. 'नवसे कन्या पुत्र होती । तरी का करणे लागे पती ।', 'शेंदूर माथी दात खाती । झेंगट हाती

नटवीचे ।' असा उपहास करू समाजाला विज्ञानकडेही घेऊन जाण्याचे कार्य करतात. तर शेंदाड शिपाई, दाढीवाला पुराणिक, पंढरपुरा जाते म्हणणारी पण वेसीपासून घरी परत येणारी आवा, वाघ आणि कोल्हा खुशालचंद बायको आणि नादान नवरा यासारख्या अभंगातून उपहासगर्भ विनोदनिर्मिती झालेली आहे.

संत तुकाराम महाराजांनी जरी आपल्या अभंगातून विपूल प्रमाणात विनोदाचा वापर केला असला तरी विनोद निर्मिती करण्यासाठी ते अभंग लिहित नाहीत तर सामन्यजनांच्या गळी भक्तीचे महत्त्व उतरावे, त्यांना इष्ट अनिष्टाची ओळख व्हावी म्हणून ते विनोदाचे साह्य घेतात.

संत तुकाराम महाराजांच्या नंतरचे वारकरी संप्रदायातील अत्यंत महत्त्वाचे संत समर्थ रामदास यांनी एका ओवीत 'टवाळाशी आवडे विनोद' असे म्हटले म्हणून या ओवीचा दाखला देऊन विनोदाला सातत्याने मानवी जीवनातून डावलण्याचा प्रयत्न केला गेला; परंतु रामदास स्वामींना सर्व प्रकारचा विनोद तुच्छ स्वरूपाचा असतो असे म्हणावयाचे होते काय? याची कोणीही शहानिशा केली नाही. रामदास स्वामी 'टवाळाशी आवडे विनोद' असे जरी म्हणत असले तरी 'मुर्खाची लक्षणे' सांगताना त्यांच्या लेखाणात उपहास, उपरोध आणि काहीसा मिष्किल असा विनोद येतोच. समार्थांच्या या दाखल्याविषयी बाळ गाडगीळ म्हणतात. ''समर्थ रामदास यांचे विनोदाबद्दल आपल्याला वाटते तितके वाईट मत नव्हतेच. उलट त्यांनी स्वतः विनोदाचा आश्रय अनेकदा घेतलेला आहे.'' विनोद हा केवळ टवाळांनाच आवडतो असे नव्हे, तो सुसंस्कृत, सभ्य आणि बुद्धिवंतांनाही आवडतो. मात्र तसे ते दिसून देत नाहीत हा भाग वेगळा.

संत वाङ्मयाप्रमाणेच पंडिती वाङ्मयातही विनोद आलेला आहे. वामन पंडिताच्या कृष्णचरित्रपर अख्यानांतील राधाविलास, भामाविलास, राधाभुजंग, रासक्रीडा आदी प्रकरणातील उत्तान शृंगारचित्रणामुळे हास्यनिर्मिती होते. वामनाने कालिंदीच्या वाळवंटातील रासक्रीडेचा 'जे जे गोपिस आपणाच जवळी वाटे असावा हरी, जाणुनिया तितुक्या स्त्रिया तितुकिया तात्काळ मूर्ती धरी' या वर्णनात आणि भामालिसातील कृष्णावर रागावलेल्या सत्यभामेच्या ''गडबडा धरणीवर लोळते । वदवती न कवीसही लोळ ते । रडत मुर्च्छित होय घडी घडी । पवन निश्चल नेत्र न उघडी । अलंकार हार गळ्यातील तोडिते । वसन आणि कंचुकी फाडिते ।' यासारख्या वर्णनातून कृष्णभक्तीभाव दाखविला असला तरी यातील शृंगारातून मिस्किल हास्यनिर्मिती झाल्याशिवाय रहात नाही. वामनाच्या 'न गर्जेती हरि गाढ वाचे, ते पापरूपी नर गाढवाचे' या श्लोकातील गाढ वाचे आणि गाढवाचे या श्लेष अलंकारातून शाब्दिक कोटी साधली गेली आहे. इ गाढ आणि

वाचा हे शब्द एकत्र यऊन गाढव असा अर्थ ध्वनित होतो. त्यामुळे विनोदनिर्मिती होते.

संत आणि पंडिती काव्यात फुटकळ स्वरूपाचा विनोदच डोकावतो असे नाही तर 'रामायण', 'महाभारत' यावरील अख्यानकाव्यात आलेल्या मनोरंजक प्रसंगातून काही प्रमाणात प्रसंगनिष्ठ विनोदही येताना दिसतो. पंडित कवी सामराज्याच्या 'रुक्मिणीहरण' या काव्यात रुक्मिणीची कृष्णाा विरहाने झालेली अवस्था असो वा इतर प्रसंग असोत त्यातून विनोद आलेला आहेच. कृष्ण विरहाने अस्वस्थ झालेल्या रुक्मिणीला जेव्हा तिच्या दास्या 'डसे तुला कृष्ण भुजंग बाई' बसे म्हणतात किंवा रुक्मिणीला स्वप्न पडते. ती झोपलेली आहे आणि कृष्ण हळूच येऊन तिच्या पलंगावर तिच्या शेजारी बसतो, तिला तांबूल विडा भरवतो. या प्रसंगातील कल्पनाविलासातून प्रसन्न विनोद निर्माण होतो. तसाच हाती सोन्याचे कडे पडताच 'पती न ये का!', असे सुखदेवाची पत्नी म्हणते, श्रीकृष्णाकडे भोजन केल्यानंतर आपल्या नेहमीच्या सवयीमुळे हाताला माती लावणारा सुदेव ब्राम्हण, श्रीकृष्णदर्शनाच्या वेळी इतर स्त्रियांची उडालेली धांधल आदी प्रसंगातून निखळ विनोदाची निर्मिती झालेली आहे. अशा शृंगारिक आणि विनादी प्रसंगामुळे ही अख्यानकाव्य मोहक आणि श्रवणीय, वाचनीय झाली आहेत.

वामन पंडिताच्या काळातीलच एक महत्त्वाचा पंडित कवी म्हणून नागेशाकडे पाहिले जाते. नागेशाच्या काव्यरचनेत जागोजागी विनोद पेरलेला आहे. 'सीतास्वयंवर' यात आलेल्या विनोदी चित्रणाविषयी ल. रा. नसिराबादकर यांचे मत पहिले म्हणजे नागेशचा विनोद कसा आहे याची प्रचिती येते. ते लिहितात, ''अहिल्योद्धारप्रसंगवर्णनात श्रीरामाच्या स्पर्शाने शिळेतून सुंदरी अवतीर्ण झलेली पाहताच भट-भिक्षुकांना आनंद होऊन आपणासही सुदर स्त्री मिळावी म्हणून प्रत्येकजन पर्वतावरील शिळा घेऊन येऊ लागला. यावेळी प्रत्येकांनी आपल्या बायकांची खादाड, कुरूप, आंधळी, नकटी, दंताळी अशा व्यंगावर बोट ठेऊन निंदा केली आहे. शेवटी तुमच्या स्त्रिया सुंदर झाल्या आहेत, तुम्ही आता घरी जा असे श्रीरामाने सांगताच घरी येऊन प्रत्येकाने आपली स्त्री रूपवती झालेली पहिली आणि सर्वांनी धडधडा दगड फेकून दिले, असे पुरूषस्वभावाचे व त्यांच्या कामासक्तीचे दर्शन विनोदाच्या आधाराने नागेशाने घडविले आहे. असे काही प्रसंग नागेशाच्या स्वयंपूर्ण प्रतिभेची साक्ष देतात. शिवधनुष्य उचलताना राजांने लंगडी सबब सांगून आपली असमर्थतात झाकण्याचा केलेला प्रयत्नही मोठ्या विनोदी पद्धतीने नागेश रंगवितात. रोज सवाशेर कणकेच्या रोट्या खाणारा आणि विधवा व सुवासिनींना घेऊन एकांतवासात ब्रम्हरसाचे सेवन करणारा बोसावी स्वभापिष्ठ आणि उपहासगर्भ विनोदाचा चांगला नमुना आहे. नागेशाने आपल्या काळातील समाजात चाललेल्या

ढोंगबाजीवर टाकलेला हा प्रकाशच म्हटले पाहिजे. मनुष्यस्वभावाच्या विसंगतीदर्शनातून विनोदनिर्मितीचा नागेशाचा हा प्रयत्न उल्लेखनीय असला, त्यातून त्याचे सूक्ष्म निरिक्षणही दिसून येत असलेतरी बऱ्याच ठिकाणी या विनोदाचे रूपांतर बाष्कळपणात झाले आहे.'' इथे नागेशाच्या चांगल्या विनोदाचे कौतुक आणि हीन विनोदाची निंदाही केली असून पुढे त्यांनी प्राचीन कवी मंळळात विनोबुद्धी असलेला नागेश हा एकमेव कवी आहे. असेही म्हटले आहे.

मध्वमुनीश्वर या पंडित कवीच्या पदरचनेतही शृंगारातून विनोद आलेला ओह. 'डोळे लावून शब्द बोलता अशी अवस्था का घडली । कोण परनारी तुम्ही भोगाली, तुमची परीक्षा मज कळली ।' इथे राधेने कृष्णावर बाहेरख्यालीपणणाचे जे प्रेमळ आरोप करून कृष्णाला कोंडीत पकडलेले आहे त्यातून मजेशिर विनोद निर्माण होतो. मध्वमुनीश्वर यांचा शिष्य अमृतराय हा मुळातच थट्टेखोर स्वभावाचा होता. त्यामुळे त्याच्या पदरचनेत विनोद येणे सहाजिकच होते.अमृतराय हा मुळातच थट्टेखोर स्वभावाचा होता. त्यामुळे त्याच्या आणतो. 'बाईल पैशाची पैशाची । कधी नव्हे पुरूषाची । जोवर धनसुत जोडी । तोवर लावी लाडीगोडी ।' हे किंवा 'बा तुझा काळ । खायला मिळती सकळ ।। हे काण बायकोचे साले । तुपावेगळा घास न गिळे ।' या सांसारिक जीवनातील वास्तवचित्रणातून, व्यक्ती व सामाजिक व्यंगातून विनोद निर्माणा झालेला आहे. तर काही ठिकाणी त्यांनी 'डोई मुंडुनी भगवे गुंडुनी पिश्वीतील द्रव्यास गिणावे । अमुतराय म्हणे या कपटपट्रूच्या का न म्या तोंडात हाणावे ।' असे ढोंगी लोकांवर उपरोधिक कोरडेही ओढलेले आहेत.

**समारोप :**

भारतीय मनावर कर्मकांड, मोक्ष, भक्तीभाव आदी विचारांचा प्रचंड पगडा असल्यामुळे विनोदाला दूर ढकलण्यात आल. ही वस्तुस्थिती असली तरी विनोद हा माणसाला सतत प्रसन्न ठेवण्याचे कार्य करतो. त्यामुळे दिवसभरातील थकवा नाहीसा होतो. सतत आनंदी हसतमुख राहिले तर कुठल्याही चिंता, व्याधींपासून माणसाला त्रास होत नाही हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे सामान्य माणसेच नाही तर तत्त्वज्ञमंडळीही विनोदापासून दूर राहू शकलेली नाहीत. याचाच परिपाक म्हणून जीवनपरिवर्तनाचे तत्त्वज्ञान सांगणारे महानभाव साहित्य असो वा संत, पंडिती साहित्य असो यातही काहीअंशी विनोद आलेला बघावयास मिळतो. एक मात्र खरे की मध्ययुगीन साहित्यात विनोद आलेला असला तरी विनोदनिर्मिती करणे किंवा विनोदीनिर्मितीसाठी साहित्यनिर्मिती करणे हा उपरोक्त साहित्यिकांचा मुळीच हेतू नाही. आपण जे तत्त्वज्ञान सांगतो आहोत.

जीवनपरिवर्तनाचा मार्ग दाखवित आहोत त्यात कुठलाही बोजडपणा येऊन ते कंटाळवाने होऊ नये म्हणून ते विनोदाचे साह्य घेताना दिसतात. तर कुठे तो कळतनकळतपणे आलेला आहे. महानुभाव, संत, पंत साहित्यात काहीअंशी विनोद असला तरी त्यात आलेला विनोद जवळ जवळ सर्व प्रकारातील आहे. विशेषतः समाजात प्रचलित अनिष्ट रूढी, प्रथांवर घणाघात करून त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि वाईट स्वभावाच्या माणसासला शाब्दिक फटकारे मारून त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी या कवींनी उपहास आणि उपरोध या समाजसुधारणेचे काम करणाऱ्या विनोद प्रकारांचा अधिक्याने वापर केलेला आहे. काही ठिकाणी वास्तव चित्रणातून प्रसन्न विनोदचीही निर्मिती झालेली आहे. शिवाय व्यक्ती स्वभावातील व्यंग, सामाजिक व्यंग दिग्दर्शनातूनही विनोद निर्मिती झाल्याचे बघावयास मिळते. त्याच प्रमाणे स्फुट रचना असो की अख्यानकाव्य यातून उत्तम अशा प्रसंगानिष्ठ विनोदचीही उदाहरणे बघावयास मिळतात.

मध्ययुगीन साहित्यातील विनोदाचा आढावा घेतला असता संत तुकाराम, संत एकनाथ, आणि पंडित कवींमधील नागेश यांच्या काव्यात अधिक प्रमाणात विनोद आलेला दिसतो; परंतु संत तुकाराम आणि संत एकनाथ यांनी विनोदनिर्मिती करण्यासाठी साहित्यनिर्मिती केली नसून जीवनतत्त्वज्ञान आणि भक्तीरसाची गोडी सामन्यजनांना चांगल्याप्रकारे अनुभवता यावी म्हणून त्यांनी थोडे विनोदी अंगाने चित्रण केलेले आहे. तर पंडित कवींनी रामायण महाभारतातील पुराणकथेवरील अख्याने मोहक व्हावीत म्हणून काही ठिकाणी विनोदाचा आश्रय घेतलेला दिसतो. परंतु पंडिती काव्यातील सर्वच विनोद हा उत्तमप्रतीचा आहे असे नसून काही ठिकाणी त्या विनोदाला बाष्कळपणाचे स्वरूपही आलेले आहे.

**संदर्भ**


१) नसिराबादकर ल. रा. (जुलै २००८), प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, आ.नववी, कोल्हापूर, फडके प्रकाशन, पृ.१२६.

२) तत्रैव, पृ.१२८.

३) गाडगीळ बाळ, (५ सप्टेंबर १९९३), विनोद तत्तवज्ञान, आ., पुणे, दिलीपराज प्रकाशन, पृ.१४.

४) नसिराबादकर ल. रा. उनि., पृ. १९५.


***


**डॉ. सुखदेव इघारे**

मराठी विभागप्रमुख, कला वरिष्ठ महाविद्यालय, सावंगी (हर्सुल), औरंगाबाद.

मो. : ९४२१६७८५१७